महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण- २०२५ च्या अनुषंगाने गुणवत्ता परीक्षण व प्रमाणपत्र (Quality Testing & Certification) यासाठी येणाऱ्या खर्चाचा काही भाग प्रतिपुर्ती करण्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे.

महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

शासन निर्णय क्र. मनासो-२०२६/प्र.क्र.६५/उद्योजकता (ई-१६४२५२२)/ उद्योजकता

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- ०९ ऑक्टोबर, २०२६

वाचा -:

१. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र.कौविउ-२०१९/प्र.क्र.७६/ अभियान-१, दिनांक १८ सप्टेंबर, २०१९

२. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन निर्णय क्र. कौविउ-२०१७/प्र.क्र.२४३/ कौशल्य-२, दिनांक ०४ सप्टेंबर, २०२५

**प्रस्तावना:-**

राज्यातील स्टार्स्टअप, उद्योजकता व नाविन्यता परिसंस्थेला प्रोत्साहन व बळकटी देऊन महाराष्ट्राची, “भारतातील नवपीढीच्या उद्योजकांसाठी जागतिक दर्जाचे स्टार्टअप केंद्र” म्हणून ओळख निर्माण करण्यासाठीच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता तसेच शहरी व ग्रामीण भागातील महिला, युवा तसेच दुर्बल घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करून राज्याच्या औद्योगिक तसेच आर्थिक विकासास चालना देण्यासाठी आणि नाविन्यपूर्ण संकल्पांवर आधारीत उद्योगांना प्रोत्साहन देण्याकरिता विभागाच्या संदर्भ क्र.२ रोजीच्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण-२०२५ (Maharashtra Startup, Entrepreneurship and Innovation Policy-२०२५)" ला मान्यता देण्यात आली आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने राज्यातील स्टार्स्टअप्सना गुणवत्ता परीक्षण व प्रमाणपत्र (Quality Testing & Certification) यासाठी येणाऱ्या खर्चाच्या काही भागाची प्रतिपुर्ती करण्यासाठी आर्थिक सहाय्य करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासास चालना देण्यासाठी आणि देशातील बेरोजगारीच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी नाविन्यपूर्ण संकल्पनांवर आधारीत उद्योगांना प्रोत्साहन देण्याकरिता "महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण-२०२५ (Maharashtra Startup, Entrepreneurship and Innovation Policy-२०२५)" मंजूर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने राज्यातील स्टार्स्टअप्सना गुणवत्ता परीक्षण व प्रमाणपत्र (Quality Testing & Certification) यासाठी येणाऱ्या खर्चाच्या काही भागाची प्रतिपुर्ती

करण्यासाठी आर्थिक मदत मिळाल्यास सहाय्यभूत ठरते. यानुषंगाने स्टार्स्टअप्सना गुणवत्ता परीक्षण व प्रमाणपत्र (Quality Testing & Certification) यासाठी येणाऱ्या खर्चाच्या काही भागाची प्रतिपुर्ती करण्यासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी सोबत जोडलेल्या **प्रपत्र अ** मधील मार्गदर्शक सूचनांना मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने गुणवत्ता परीक्षण व प्रमाणपत्र (Quality Testing & Certification) यासाठी अर्थ सहाय्य करण्यासाठी पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीने तात्काळ करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१००९१७११२६४५०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRANALI PANKAJ GOSAVI YADAV

Digitally signed by PRANALI PANKAJ GOSAVI YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=CF3D0778B0543E10D0A60180DCA4B868819CF9DFE0AF798447 4200631642DE70, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=193E87F0B8C5F58941E4D2FBFDB3458DEAB3864A976F06 D3984C8149BB888D55, cn=PRANALI PANKAJ GOSAVI YADAV
Date: 2026.10.09 17:12:14 +05'30'

**(प्रणाली गोसावी-यादव)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु., अल्पसंख्यांक व क्रिडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८) डॉ. रघुनाथ माशेलकर, वरिष्ठ शास्त्रज्ञ, CSIR, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पाषाण रोड,पुणे-४११००८.
८) श्री प्रवीण परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र परिवर्तन संस्था (मित्रा)
९) श्री कौस्तुभ धवसे, मा.मुख्यमंत्री महोदय यांचे मुख्य सल्लागार.
१०) प्रधान सचिव/सचिव, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग, भारत सरकार.
११)प्रधान सचिव/सचिव, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार.
१२) अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय. मुंबई.
१५) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ग्रामिण विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पशुसंवर्धन व मत्स व्यवसाय विभा, मंत्रालय, मुंबई.
२२) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, सी.बी.डी. वेलापूर, नवी मुंबई.
२३) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई.
२४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
२५)मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई.
२६) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई च्या सर्वसाधारण सभा व नियमाक मंडळाचे सर्व सदस्य
२७)कुलगुरु, रतन टाटा महाराष्ट्र राज्य  कोशल्य विद्यापीठ, मुंबई
२८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-१), महाराष्ट्र, मुंबई.
२९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-२), महाराष्ट्र, नागपूर.
३०) महालेखापाल (लेखा परीक्षा-१), महाराष्ट्र, मुंबई.
३१) महालेखापाल (लेखा परीक्षा-२), महाराष्ट्र, नागपूर.
३२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३५) सर्व विभागीय आयुक्त.
३६) सर्व जिल्हाधिकारी.
३७)सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.
३८) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३९) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

४०) उपसंचालक, विभागीय मुख्यालय, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे
नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

४१) निवड नस्ती (उद्योजकता).

## प्रपत्र अ

## गुणवत्ता चाचणी व प्रमाणन सहाय्य योजनेच्या मार्गदर्शक सूचना

### १. पार्श्वभूमी

१.१ महाराष्ट्र शासनामार्फत सन २०१९ पासून पात्र स्टार्टअप्सना गुणवत्ता चाचणी व प्रमाणनासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. राष्ट्रीय चाचणी व अंशांकन प्रयोगशाळा प्रत्यायन मंडळ (National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories) तसेच भारतीय मानक ब्युरो (Bureau of Indian Standards) यांच्याकडून मान्यताप्राप्त अथवा प्रत्यायित प्रयोगशाळांमार्फत करण्यात आलेल्या चाचणी व प्रमाणनासाठी स्टार्टअप्सनी केलेल्या खर्चाच्या काही भागाची प्रतिपूर्ती या अंतर्गत करण्यात येते.

१.२ गुणवत्ता चाचणी करण्यात आलेली, प्रमाणित तसेच विहित मानकांशी सुसंगत उत्पादने बाजारपेठेत प्रवेश, नियामक मान्यता, व्यवसायवृद्धी आणि जागतिक स्पर्धात्मकता साध्य करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याची बाब विचारात घेऊन, महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण, २०२५ अंतर्गत सदर सहाय्यामध्ये लक्षणीय वाढ करण्यात आली आहे.

१.३ महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण, २०२५ अंतर्गत पात्र स्टार्टअप्सना त्यांच्या नाविन्यपूर्ण उत्पादने व उपाययोजनांच्या गुणवत्ता चाचणी व प्रमाणनासाठी केलेल्या खर्चाची, प्रति स्टार्टअप कमाल रुपये ५,००,०००/- इतक्या मर्यादेपर्यंत प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

१.४ गुणवत्ता चाचणी व प्रमाणन सहाय्यासंदर्भात सन २०१९ व सन २०२१ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या पूर्वीच्या मार्गदर्शक सूचनांच्या अधिक्रमणाने या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

### २. योजनेची उद्दिष्टे

सदर योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे राहतील :-

२.१ उत्पादन विकास व व्यापारीकरणाच्या टप्प्यांवर गुणवत्ता चाचणी, प्रमाणीकरण आणि प्रमाणनाच्या आवश्यकतांमुळे स्टार्टअप्सवर येणारा आर्थिक भार कमी करणे.

२.२ उत्पादन विकास व नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी उपलब्ध आर्थिक संसाधनांचा मोठा भाग इतरत्र वळवावा लागू नये, यासाठी आवश्यक गुणवत्ता चाचणी व प्रमाणन करण्यास स्टार्टअप्सना सहाय्य करणे.

२.३ स्टार्टअप्सनी विकसित केलेली उत्पादने व उपाययोजना लागू असलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुणवत्ता, सुरक्षितता, कार्यक्षमता आणि नियामक मानकांशी सुसंगत राहतील, यासाठी सहाय्य करणे.

२.४ स्टार्टअप्सनी विकसित केलेल्या नाविन्यपूर्ण उत्पादने व उपाययोजनांची बाजारसिद्धता, विश्वासार्हता, सुरक्षितता आणि कार्यक्षमता यामध्ये सुधारणा करणे.

२.५ स्टार्टअप्सना विश्वसनीय त्रयस्थ संस्थांकडून चाचणी अहवाल व प्रमाणपत्रे प्राप्त करण्यास सक्षम करून देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये प्रवेश सुलभ करणे.

२.६ पात्र स्टार्टअप्सच्या उत्पादनांबाबत ग्राहकांचा व गुंतवणूकदारांचा विश्वास वाढविणे तसेच भागीदारीच्या संधी वृद्धिंगत करणे.

२.७ नाविन्यपूर्ण उत्पादने व उपाययोजनांचा उत्पादन विकासापासून व्यापारीकरण व बाजारपेठ विस्तारापर्यंतचा प्रवास गतिमान करणे.

**३. सहाय्याची व्याप्ती**

**३.१ सहाय्याचे स्वरूप**

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत पात्र स्टार्टअप्सनी पुढील संस्थांमार्फत केलेल्या गुणवत्ता चाचणी व प्रमाणनासाठी केलेल्या पात्र खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल :-

अ. राष्ट्रीय चाचणी व अंशांकन प्रयोगशाळा प्रत्यायन मंडळ (NABL) यांच्याकडून प्रत्यायित प्रयोगशाळा; आणि
आ. भारतीय मानक ब्युरो (BIS) यांच्याकडून मान्यताप्राप्त प्रयोगशाळा.

**३.२ प्रतिपूर्तीचे प्रमाण**

वस्तू व सेवा कर तसेच इतर लागू कर वगळून, पात्र गुणवत्ता चाचणी व प्रमाणन खर्चाची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येईल.

**३.३ कमाल मर्यादा**

सदर योजनेंतर्गत प्रति स्टार्टअप कमाल रुपये ५,००,०००/- इतके आर्थिक सहाय्य अनुज्ञेय राहील.

### ३.४ योजनेंतर्गत एकत्रित कमाल मर्यादा

स्टार्टअपला सदर योजनेंतर्गत एकापेक्षा अधिक अर्ज सादर करता येतील. तथापि, सर्व अर्जांद्वारे संबंधित स्टार्टअपला मंजूर करण्यात आलेल्या आर्थिक सहाय्याची एकूण रक्कम रुपये ५,००,०००/- या एकत्रित कमाल मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही.

सदर योजनेंतर्गत स्टार्टअपने यापूर्वी प्राप्त केलेले कोणतेही आर्थिक सहाय्य एकत्रित कमाल मर्यादेची गणना करताना विचारात घेण्यात येईल.

### ४. पात्रतेचे निकष

पुढील अटींची पूर्तता करणारे स्टार्टअप सदर योजनेंतर्गत अर्ज करण्यास पात्र राहील :-

**४.१** अर्जदार संस्था उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाकडून (Department for Promotion of Industry and Internal Trade) वैधरीत्या मान्यताप्राप्त स्टार्टअप असणे आवश्यक राहील.

**४.२** अर्जदार स्टार्टअपची स्थापना अथवा नोंदणी महाराष्ट्र राज्यात झालेली असावी तसेच त्याचे व्यावसायिक कार्य राज्यात सुरू असणे आवश्यक राहील.

**४.३** गुणवत्ता चाचणी अथवा प्रमाणन हे राष्ट्रीय चाचणी व अंशांकन प्रयोगशाळा प्रत्यायन मंडळ (NABL) प्रत्यायित किंवा भारतीय मानक ब्युरो (BIS) मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमार्फत करण्यात आलेले असणे आवश्यक राहील.

**४.४** विशिष्ट, उदयोन्मुख अथवा विशेषीकृत क्षेत्रांमध्ये आवश्यक चाचणी सुविधा राष्ट्रीय चाचणी व अंशांकन प्रयोगशाळा प्रत्यायन मंडळ (NABL) प्रत्यायित किंवा भारतीय मानक ब्युरो (BIS) मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमार्फत उपलब्ध नसल्यास, अपवादात्मक प्रकरणांचा विचार करण्यात येऊ शकेल. अशा प्रकरणात अर्जदाराने पुरेसे कारणमीमांसा निवेदन, पुरावे व संबंधित पूरक कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**४.५** गुणवत्ता चाचणी अथवा प्रमाणन हे नाविन्यपूर्ण उत्पादन किंवा उपाययोजनेचा उत्पादन विकास, तांत्रिक प्रमाणीकरण, विहित मानकांची पूर्तता, नियामक मान्यता, बाजारसिद्धता अथवा प्रमाणन यांच्याशी संबंधित असणे आवश्यक राहील.

**४.६** नियमित उत्पादन प्रक्रियेचा भाग म्हणून करण्यात येणाऱ्या नित्य, पुनरावृत्ती स्वरूपाच्या अथवा नियतकालिक गुणवत्ता नियंत्रण चाचण्या सदर योजनेंतर्गत सहाय्यास पात्र राहणार नाहीत.

**५. देयकाची वैधता व दावा सादर करण्याची कालमर्यादा**

**५.१** संबंधित देयकाच्या दिनांकापासून कमाल १२ महिन्यांच्या कालावधीत प्रतिपूर्तीसाठी अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

**५.२** देयकाच्या दिनांकापासून १२ महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर सादर करण्यात आलेल्या दाव्यांचा सर्वसाधारणपणे विचार करण्यात येणार नाही.

**५.३** प्रतिपूर्तीचा दावा सादर करण्यापूर्वी अर्जदार स्टार्टअपने गुणवत्ता चाचणी अथवा प्रमाणनासाठी आकारण्यात आलेल्या शुल्काचा पूर्ण भरणा केलेला असणे आवश्यक राहील.

**६. अपात्र खर्च**

पुढील स्वरूपाचा खर्च प्रतिपूर्तीसाठी पात्र राहणार नाही :-

**६.१** नियमित उत्पादन प्रक्रियेदरम्यान करण्यात येणाऱ्या नित्य, पुनरावृत्ती स्वरूपाच्या अथवा नियतकालिक गुणवत्ता नियंत्रण चाचण्यांवरील खर्च.

**६.२** सल्लागार, सुलभीकरण, मध्यस्थ अथवा अभिकरण शुल्क.

**६.३** अर्जदार स्टार्टअपने अंतर्गत पातळीवर केलेल्या चाचण्यांवरील खर्च.

**६.४** आवश्यक प्रत्यायन अथवा मान्यता नसलेल्या प्रयोगशाळांना अदा करण्यात आलेले चाचणी शुल्क; तथापि, परिच्छेद ४.४ अंतर्गत अपवादात्मक मान्यता विशेषतः प्रदान करण्यात आलेल्या प्रकरणांना ही तरतूद लागू राहणार नाही.

**६.५** नमुना प्रतिकृती, उत्पादने अथवा नमुने यांची संकल्पना, रचना, विकास किंवा निर्मिती करण्यासाठी झालेला खर्च.

**६.६** चाचणी प्रयोगशाळा अथवा प्रमाणन संस्थेकडे नमुने पाठविण्यासाठी झालेला वाहतूक, कुरिअर, मालवाहतूक अथवा लॉजिस्टिक खर्च.

६.७ अंशांकन शुल्क; तथापि, संबंधित अंशांकन हे मंजूर चाचणी कार्यपद्धतीचा अविभाज्य व अनिवार्य घटक असल्यास, अशा शुल्काचा विचार करण्यात येऊ शकेल.

६.८ वस्तू व सेवा कर तसेच इतर लागू कर.

**७. आवश्यक कागदपत्रे**

अर्जदार स्टार्टअपने पुढील कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित स्कॅन प्रती संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक राहील :-

**अ. स्टार्टअपशी संबंधित मूलभूत कागदपत्रे**

**अ.१** उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाचे (DPIIT) वैध मान्यता प्रमाणपत्र.

**अ.२** कंपनी निबंधकासह, लागू असल्यास, सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले संस्था स्थापना अथवा नोंदणी प्रमाणपत्र.

**अ.३** स्टार्टअपची स्थापना अथवा नोंदणी महाराष्ट्र राज्यात झालेली असून त्याचे व्यावसायिक कार्य राज्यात सुरू असल्याबाबतचे दस्तऐवजी पुरावे.

**ब. आर्थिक व अनुपालनासंबंधी कागदपत्रे**

**ब.१** स्टार्टअपच्या स्थापनेपासून अर्जाच्या दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा तपशील नमूद असलेले सनदी लेखापालाकडून प्रमाणित घोषणापत्र.

**ब.२** स्टार्टअपला प्राप्त झालेल्या अनुदान, कर्ज अथवा समभाग गुंतवणुकीसह एकूण अर्थसहाय्याचा तपशील नमूद असलेले सनदी लेखापालाकडून प्रमाणित घोषणापत्र.

**ब.३** संबंधित गुणवत्ता चाचणी अथवा प्रमाणनाच्या त्याच खर्चासाठी कोणत्याही शासकीय विभागाकडून, शासकीय यंत्रणेकडून, खासगी संस्थेकडून अथवा अन्य कोणत्याही घटकाकडून कोणतेही अनुदान, प्रतिपूर्ती किंवा आर्थिक सहाय्य प्राप्त झालेले नसल्याचे स्टार्टअपच्या अधिकृत लेटरहेडवरील घोषणापत्र.

**क. गुणवत्ता चाचणी व प्रमाणनासंबंधी कागदपत्रे**

**क.१** गुणवत्ता चाचणी अथवा प्रमाणनासाठी संबंधित चाचणी प्रयोगशाळा किंवा प्रमाणन संस्थेने निर्गमित केलेले देयक अथवा देयके

**क.२** देयक अदा केल्याचा पुरावा, जसे की संबंधित बँक खाते उतारा, व्यवहार पावती अथवा पडताळणीयोग्य अन्य बँकिंग अभिलेख.

**क.३** प्रत्यायित अथवा मान्यताप्राप्त प्रयोगशाळा किंवा प्रमाणन संस्थेने निर्गमित केलेला अंतिम चाचणी अहवाल, चाचणी प्रमाणपत्र अथवा प्रमाणन दस्तऐवज.

**क.४** चाचणी प्रयोगशाळेचे लागू असल्याप्रमाणे वैध NABL प्रत्यायन प्रमाणपत्र अथवा BIS मान्यता प्रमाणपत्र.

**क.५** चाचणी अथवा प्रमाणन करण्यात आलेल्या उत्पादनाचे किंवा उपाययोजनेचे सविस्तर वर्णन.

**क.६** गुणवत्ता चाचणी अथवा प्रमाणन करण्यामागील उद्देश स्पष्ट करणारे टिपण, जसे की उत्पादन प्रमाणीकरण, विहित मानकांची पूर्तता, नियामक मान्यता, सुरक्षितता मूल्यमापन, कार्यक्षमता चाचणी अथवा बाजारपेठेसाठी आवश्यक प्रमाणन.

**क.७** राष्ट्रीय चाचणी व अंशांकन प्रयोगशाळा प्रत्यायन मंडळ (NABL) प्रत्यायित किंवा भारतीय मानक ब्युरो (BIS) मान्यताप्राप्त प्रयोगशाळेव्यतिरिक्त अन्य प्रयोगशाळेमार्फत चाचणी करण्यात आलेली असल्यास, त्यासंदर्भातील समर्थनार्थ कागदपत्रे व सविस्तर कारणमीमांसा.

**ड. बँक खात्याचा तपशील**

**ड.१** अर्जदार स्टार्टअपच्या नावाने असलेल्या नोंदणीकृत बँक खात्याचा रद्द केलेला धनादेश.

**ड.२** बँक खात्याचा तपशील हा लागू असल्याप्रमाणे स्टार्टअपने DPIIT, उद्यम नोंदणी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी अथवा अन्य संबंधित वैधानिक किंवा शासकीय प्राधिकरणाकडे सादर केलेल्या अभिलेखांशी सुसंगत असणे आवश्यक राहील.

मूल्यमापन व पडताळणी प्रक्रियेदरम्यान महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी अथवा नियुक्त मूल्यमापन संस्था अर्जदार स्टार्टअपकडून आवश्यकतेनुसार अतिरिक्त कागदपत्रे, स्पष्टीकरण अथवा माहिती मागवू शकेल.

## ८. अटी व शर्ती

८.१ परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकानुसार अर्जांचा कालानुक्रमे विचार करण्यात येईल. अर्जांवरील कार्यवाही ही वार्षिक अर्थसंकल्पांतर्गत निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहील.

८.२ केवळ अर्ज सादर केल्यामुळे अर्जदार स्टार्टअपला प्रतिपूर्ती प्राप्त करण्याचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.

८.३ अर्जदाराने सादर केलेली सर्व कागदपत्रे व माहिती अचूक, परिपूर्ण, कायदेशीरदृष्ट्या वैध आणि विधिवत स्वसाक्षांकित असणे आवश्यक राहील.

८.४ खोटी, दिशाभूल करणारी, बनावट अथवा अपूर्ण माहिती सादर केल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येऊ शकेल :-

अ. अर्ज नाकारणे;
आ. मंजुरी रद्द करणे;
इ. यापूर्वी प्रतिपूर्ती करण्यात आलेल्या रकमेची वसुली करणे;
ई. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत राबविण्यात येणाऱ्या इतर योजना अथवा कार्यक्रमांसाठी संबंधित स्टार्टअपला अपात्र ठरविणे; आणि
उ. लागू असल्याप्रमाणे दंडात्मक, दिवाणी अथवा फौजदारी कार्यवाही करणे.

८.५ प्रतिपूर्तीची रक्कम केवळ अर्जदार स्टार्टअपच्या नावाने असलेल्या नोंदणीकृत व्यावसायिक बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

८.६ प्रतिपूर्तीची रक्कम स्टार्टअपच्या कोणत्याही प्रवर्तक, संस्थापक, संचालक, भागीदार, कर्मचारी अथवा प्राधिकृत प्रतिनिधीच्या वैयक्तिक बँक खात्यामध्ये जमा करण्यात येणार नाही.

८.७ महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत पुढीलपैकी कोणत्याही पडताळणी उपाययोजना करण्यात येऊ शकतील :-

अ. स्टार्टअप, उत्पादन अथवा चाचणी प्रक्रियेची प्रत्यक्ष पडताळणी;
आ. त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक अथवा आर्थिक लेखापरीक्षण;
इ. दूरध्वनीद्वारे, आभासी माध्यमातून अथवा ऑनलाइन पडताळणी;
ई. देयके व त्यासंबंधित अदा केलेल्या रकमेची पडताळणी;

उ. संबंधित प्रयोगशाळेच्या प्रत्यायन अथवा मान्यतेच्या वैधतेची पडताळणी; आणि
ऊ. चाचणी प्रयोगशाळा अथवा प्रमाणन संस्थेकडून थेट खातरजमा.

८.८ ज्या दिनांकास चाचणी करण्यात आली व संबंधित देयक निर्गमित करण्यात आले, त्या दिनांकास चाचणी प्रयोगशाळेकडे वैध प्रत्यायन अथवा मान्यता असणे आवश्यक राहील.

८.९ चाचणी पूर्ण झाल्यानंतर पूर्वलक्षी प्रभावाने प्राप्त केलेले प्रत्यायन अथवा मान्यता ग्राह्य धरली जाणार नाही.

८.१० प्रत्येक देयकाचा विचार केवळ एका प्रतिपूर्ती दाव्यासाठी करण्यात येईल.

८.११ अनेक दावे सादर करण्यासाठी अथवा योजनेंतर्गत निर्धारित आर्थिक कमाल मर्यादा टाळण्याच्या उद्देशाने कोणतेही देयक किंवा चाचणी काम कृत्रिमरीत्या विभाजित अथवा तुकड्यांमध्ये विभागता येणार नाही.

८.१२ त्याच देयकाची अथवा त्याच खर्चाची दुबार प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहणार नाही.

८.१३ संबंधित स्टार्टअपने त्याच देयकासाठी अथवा त्याच खर्चासाठी अन्य शासकीय विभाग, शासकीय यंत्रणा, खासगी संस्था अथवा अन्य कोणत्याही घटकाकडून प्रतिपूर्ती प्राप्त केली असल्यास किंवा भविष्यात प्राप्त केल्यास, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी पुढीलप्रमाणे कार्यवाही करू शकेल :-

अ. अर्ज नाकारणे अथवा रद्द करणे;
आ. मंजुरी मागे घेणे;
इ. यापूर्वी प्रतिपूर्ती करण्यात आलेल्या रकमेची लागू दंडासह वसुली करणे; आणि
ई. आवश्यक व उचित समजण्यात येईल अशी पुढील कार्यवाही करणे.

८.१४ स्टार्टअपने सादर केलेले चाचणी अहवाल, तांत्रिक दस्तऐवज आणि अन्य गोपनीय माहिती गोपनीय ठेवण्यात येईल. तथापि, वैधानिक अनुपालन, शासकीय लेखापरीक्षण, चौकशी, न्यायालयीन कार्यवाही अथवा योजनेंतर्गत पडताळणीसाठी माहिती उघड करणे आवश्यक असल्यास, त्यास अपवाद राहील.

८.१५ गुणवत्ता चाचणी व प्रमाणन सहाय्य योजनेंतर्गत कोणत्याही स्टार्टअपला देण्यात येणारे एकूण आर्थिक सहाय्य रुपये ५,००,०००/- पेक्षा अधिक असणार नाही.

८.१६ या सुधारित योजनेंतर्गत पात्र ठरणाऱ्या नवीन गुणवत्ता चाचणी व प्रमाणन खर्चालाच या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

८.१७ पूर्वीच्या गुणवत्ता चाचणी व प्रमाणन सहाय्य योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य प्राप्त केलेल्या स्टार्टअप्सना या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीच्या दिनांकापूर्वी पूर्ण करण्यात आलेल्या चाचण्या अथवा निर्गमित करण्यात आलेली देयके यांसाठी कोणतीही थकबाकी अथवा फरकाची प्रतिपूर्ती मागता येणार नाही.

८.१८ महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण, २०२५ मधील तरतुदीनुसार गुणवत्ता चाचणी व प्रमाणन सहाय्य योजनेंतर्गत कोणत्याही स्टार्टअपला देण्यात येणारे एकूण आर्थिक सहाय्य रुपये ५,००,०००/- पेक्षा अधिक असणार नाही. या मार्गदर्शक सूचना त्यांच्या अंमलबजावणीच्या दिनांकानंतर करण्यात आलेल्या गुणवत्ता चाचणी व प्रमाणनासाठी लागू राहतील. पूर्वीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सहाय्य प्राप्त केलेल्या स्टार्टअप्सना पूर्वी करण्यात आलेल्या चाचण्यांसाठी कोणतीही थकबाकी अथवा फरकाची प्रतिपूर्ती मागता येणार नाही.

८.१९ गुणवत्ता चाचणी अथवा प्रमाणन हे संबंधित स्टार्टअपच्या उत्पादन विकास, तांत्रिक प्रमाणीकरण, नियामक अनुपालन, बाजारपेठ प्रवेश अथवा व्यापारीकरणाच्या आवश्यकतांशी संबंधित नसल्याचे आढळल्यास, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी संबंधित अर्ज नाकारू शकेल.

८.२० पात्रता, खर्चाची अनुज्ञेयता आणि प्रतिपूर्तीची रक्कम यांसंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम राहील.

## ९. अर्थनिर्वचन व सुधारणा

९.१ योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या कार्यपद्धतीविषयक सूचना, स्पष्टीकरणे, अर्जाचे नमुने आणि प्रमाणित कार्यप्रणाली महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येऊ शकतील.

९.२ महाराष्ट्र शासनास या मार्गदर्शक सूचना अथवा योजनेतील कोणतीही तरतूद, पूर्णतः अथवा अंशतः, आवश्यकतेनुसार सुधारित करणे, बदल करणे, शिथिल करणे, स्थगित ठेवणे अथवा मागे घेण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

****************************

## Guidelines Quality Testing and Certification Support Scheme

### 1. Background

1.1 The Government of Maharashtra has been providing financial support to eligible startups for quality testing and certification since 2019 by reimbursing a portion of the expenditure incurred for testing and certification undertaken through laboratories recognised or accredited by the National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories (NABL) and the Bureau of Indian Standards (BIS).

1.2 The Maharashtra Startup, Entrepreneurship and Innovation Policy, 2025 has significantly enhanced this support in recognition of the critical role of quality-tested, certified and standards-compliant products in facilitating market access, regulatory acceptance, business expansion and global competitiveness

1.3 Under the Maharashtra Startup, Entrepreneurship and Innovation Policy, 2025, eligible startups may receive reimbursement of expenditure incurred for the quality testing and certification of innovative products and solutions, subject to a maximum limit of ₹5,00,000 per startup.

1.4 These guidelines supersede the earlier guidelines issued in 2019 and 2021 relating to quality testing and certification support.

### 2. Objectives

The objectives of the Scheme are to:

2.1 Reduce the financial burden on startups arising from quality testing, validation and certification requirements during the product development and commercialisation stages
2.2 Enable startups to undertake necessary testing and certification without diverting substantial financial resources away from product development and innovation.
2.3 Support startups in ensuring that their products and solutions comply with applicable national and international quality, safety, performance and regulatory standards.
2.4 Improve the market readiness, reliability, safety and performance of innovative products and solutions developed by startups.
2.5 Facilitate access to domestic and international markets by enabling startups to obtain credible third-party testing reports and certifications.
2.6 Strengthen customer confidence, investor confidence and partnership opportunities for eligible startups.
2.7 Accelerate the journey of innovative products and solutions from product development to commercialisation and market expansion.

**3. Scope of Support**

**3.1 Nature of Support**

The Maharashtra State Innovation Society (MSInS) shall reimburse eligible expenditure incurred by startups for quality testing and certification undertaken through:

a. NABL-accredited laboratories; and
b. BIS-recognised laboratories.

**3.2 Percentage of Reimbursement**

100% of the eligible quality testing and certification expenditure shall be reimbursed, excluding Goods and Services Tax and other applicable taxes.

**3.3 Maximum Limit**

The maximum financial assistance admissible under the Scheme shall be ₹5,00,000 per startup

**3.4 Cumulative Limit under the Scheme**

A startup may submit more than one application under the Scheme. However, the total amount sanctioned to the startup across all applications shall not exceed the cumulative limit of ₹5,00,000.

Any financial assistance previously received by the startup under this Scheme shall be included while calculating the cumulative limit.

**4. Eligibility Criteria**

A startup shall be eligible to apply under the Scheme subject to fulfilment of the following conditions:

4.1 The applicant entity must be a valid startup recognised by the Department for Promotion of Industry and Internal Trade (DPIIT).
4.2 The applicant startup must be incorporated or registered in Maharashtra and must have business operations in the State.
4.3 The testing or certification must be undertaken through a NABL-accredited or BIS-recognised laboratory.
4.4 Exceptions may be considered in niche, emerging or specialised sectors where the required testing facility is not available through a NABL-accredited or BIS-recognised laboratory. The

applicant shall submit adequate justification, evidence and supporting documents for such consideration.

4.5 The testing or certification must relate to product development, technical validation, standards compliance, regulatory approval, market readiness or certification of an innovative product or solution.

4.6 Routine, repetitive or periodic quality control tests undertaken as part of regular production shall not be eligible under the Scheme.

**5. Validity of Invoice and Claim Timeline**

5.1 An application for reimbursement must be submitted within a maximum period of 12 months from the date of the relevant invoice.

5.2 Claims submitted after the expiry of 12 months from the invoice date shall not ordinarily be considered.

5.3 The applicant startup must have paid the testing or certification charges before submitting the reimbursement claim.

**6. Non-Eligible Expenditure**

The following expenditure shall not be eligible for reimbursement:

6.1 Routine, repetitive or periodic quality control tests undertaken during regular production.

6.2 Consultancy, facilitation, intermediary or agency fees

6.3 Costs incurred for testing conducted internally by the applicant startup.

6.4 Testing charges paid to laboratories that do not hold the required accreditation or recognition, except where an exception has been specifically approved under Clause 4.4.

6.5 Costs incurred for designing, developing or manufacturing prototypes, products or samples.

6.6 Transportation, courier, freight or logistics expenses incurred for delivering samples to the testing laboratory or certification body.

6.7 Calibration charges, unless such calibration is an integral and mandatory component of the approved testing protocol.

6.8 Goods and Services Tax and other applicable taxes.

**7. Documents Required**

The applicant startup shall upload self-attested scanned copies of the following documents:

**A. Basic Startup Documents**

A.1 Valid DPIIT Recognition Certificate.

A.2 Certificate of Incorporation or Registration issued by the competent authority, including the Registrar of Companies, wherever applicable.

A.3 Documentary evidence demonstrating that the startup is incorporated or registered in Maharashtra and has business operations in the State.

**B. Financial and Compliance Documents**

B.1 Declaration certified by a Chartered Accountant indicating the revenue earned by the startup since its incorporation.

B.2 Declaration certified by a Chartered Accountant providing details of funding received by the startup, including grants, loans or equity investment.

B.3 Declaration on the startup's official letterhead confirming that no grant, reimbursement or financial assistance has been received from any Government Department, Government agency, private organisation or any other entity for the same testing or certification expenditure.

**C. Testing and Certification Documents**

C.1 Invoice or invoices issued by the testing laboratory or certification body for the quality testing or certification undertaken.

C.2 Proof of payment, such as the relevant bank statement, transaction receipt or other verifiable banking record.

C.3 Final test report, testing certificate or certification document issued by the accredited or recognised laboratory or certification body.

C.4 Valid accreditation or recognition certificate of the testing laboratory, including NABL accreditation or BIS recognition, as applicable.

C.5 Detailed description of the product or solution tested or certified.

C.6 A note explaining the purpose of the testing or certification, such as product validation, standards compliance, regulatory approval, safety assessment, performance testing or market certification.

C.7 Supporting documents and justification where testing has been undertaken through a laboratory other than a NABL-accredited or BIS-recognised laboratory.

**D. Banking Details**

D.1 Cancelled cheque of the registered bank account held in the name of the applicant startup.

D.2 The bank account details should correspond with the records submitted by the startup to DPIIT, Udyam Registration, MSInS or any other relevant statutory or Government authority, wherever applicable.

MSInS or the designated evaluator may seek additional documents, clarifications or information from the applicant startup during the evaluation and verification process.

**8. Terms and Conditions**

8.1 Applications shall be considered in chronological order based on the date of receipt of a complete application and shall be processed subject to the availability of funds under the annual budget.

8.2 Submission of an application shall not, by itself, confer any right upon the applicant startup to receive reimbursement.

8.3 All documents and information submitted by the applicant must be accurate, complete, legally valid and duly self-attested.

8.4 Submission of false, misleading, forged or incomplete information may result in:

a. Rejection of the application;
b. Cancellation of the sanction;
c. Recovery of the amount already reimbursed;
d. Disqualification from other schemes or programmes administered by MSInS; and
e. Penal, civil or criminal action, as may be applicable.

8.5 Reimbursement shall be credited only to the registered corporate bank account held in the name of the applicant startup.

8.6 Reimbursement shall not be credited to the personal bank account of any promoter, founder, director, partner, employee or authorised representative of the startup.

8.7 MSInS may undertake any of the following verification measures:

a. Physical verification of the startup, product or testing activity;

b. Third-party technical or financial audit;
c. Telephonic, virtual or online verification;
d. Verification of invoices and payments;
e. Verification of the laboratory's accreditation or recognition status; and
f. Direct confirmation from the testing laboratory or certification body.

8.8 The testing laboratory must hold valid accreditation or recognition on the date on which the testing was conducted and the relevant invoice was issued.

8.9 Accreditation or recognition obtained retrospectively after completion of the testing shall not be accepted.

8.10 Each invoice shall be considered for only one reimbursement claim.

8.11 An invoice or testing assignment shall not be artificially divided or split for the purpose of submitting multiple claims or circumventing the financial ceiling under the Scheme.

8.12 Double reimbursement of the same invoice or expenditure shall not be permitted.

8.13 Where the startup has received or subsequently receives reimbursement for the same invoice or expenditure from another Government Department, Government agency, private organisation or any other entity, MSInS may:

a. Reject or cancel the application;
b. Withdraw the sanction;
c. Recover the amount already reimbursed, along with an applicable penalty; and
d. Initiate such further action as may be considered appropriate.

8.14 Test reports, technical documents and other confidential information submitted by the startup shall be kept confidential, except where disclosure is required for statutory compliance, Government audit, investigation, legal proceedings or verification under the Scheme.

8.15 The total financial assistance provided to a startup under the Quality Testing and Certification Support Scheme shall not exceed ₹5,00,000.

8.16 These guidelines shall apply only to new quality testing and certification expenditure eligible under the revised Scheme.

8.17 Startups that have previously received financial assistance under the earlier Quality Testing and Certification Support Scheme shall not be entitled to claim arrears or differential reimbursement for tests completed or invoices issued before the effective date of these guidelines.

8.18 The total financial assistance provided to any startup under the Quality Testing and Certification Support Scheme shall not exceed ₹5,00,000, in accordance with the Maharashtra Startup, Entrepreneurship and Innovation Policy, 2025. These guidelines shall apply only to quality testing and certification undertaken after their effective date. Startups that have received assistance under the earlier guidelines shall not be eligible to claim any arrears or differential reimbursement for tests undertaken previously.

8.19 MSInS may reject an application where the testing or certification is not found to be relevant to the product development, validation, regulatory compliance, market access or commercialisation requirements of the startup.

8.20 The decision of the competent authority regarding eligibility, admissibility of expenditure and the amount of reimbursement shall be final.

**9. Interpretation and Amendments**

9.1 MSInS may issue procedural instructions, clarifications, application formats and standard operating procedures necessary for implementation of the Scheme.

9.2 The Government of Maharashtra reserves the right to amend, modify, relax, suspend or withdraw any provision of these guidelines or the Scheme, in whole or in part, as may be considered necessary.

****************************